दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक २२१ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.४ नोव्हेंबर २०२० • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी ई-पेपर

दैनिक रायगड नगरी वृत्तपत्र डिजिटल स्वरुपात देखील सुरु झाले असून आता आपण www.raigadnagari.com या वेबसाईट वर जाऊन ई-पेपर वाचू शकता, तर वाट कसली पाहताय! पनवेल तसेच नवी मुंबई व रायगड जिल्ह्यातील महत्वपूर्ण बातम्यांसाठी आपण रोजच्या रोज भेट द्या आमच्या वेब साईट आणि त्यावरील ई-पेपरला!

# न्हावा-शेवा बंदरातून १४ कोटींची विदेशी सिगारेट जप्त

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : न्हावाशेवा बंदरातुन मुंबई डीआरआय विभागाने शनिवारी दुबईहून देशात तस्करी केली जात असलेल्या विदेशी सिगारेटचा साठा जप्त केला आहे. सिगारेट ल्युमिनियम कचरा आणि वाहन इंजिनच्या भागावर लपवून ठेवण्यात आले होते. तस्करीतुन आलेल्या सिगारेटची किंमत १४ कोटी रुपयांच्या घरात आहे.

उत्तर प्रदेशमधील माफिया टोळीमार्फत दुबईहून भारतात परदेशी सिगारेटची तस्करी होणार असल्याची टीप मुंबई डीआरआयच्या विभागाच्या अधिकाऱ्यांना खबऱ्यांकडून खात्रीलायक माहिती मिळाली होती. विश्वसनीय खबऱ्यांकडून माहिती मिळाल्यानंतर न्हावा-शेवा बंदरातून डीआरआय अधिकाऱ्यांनी संशयित कंटेनर ताब्यात घेतला. कंटेनरची कसुन तपासणी करताना कंटेनरमध्ये ल्युमिनचा भंगार आणि इंजिनच्या स्पेअरपार्टच्या नावाखाली आलेल्या सामानात लपवून ठेवलेल्या विदेशी सिगरेटचा साठा सापडला.

सिमाशुल्क अधिनियम १९६२ च्या तरतुदीनुसार सिगारेटचा साठा जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणात अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. मात्र लवकरच आरोपींना अटक करण्यात येणार असल्याची माहिती डीआर आय सुत्रांनी दिली. न्हावा शेवा बंदरातून मागील सहा महिन्यांतील ही तिसरी घटना आहे. तीन-चार महिन्यांपूर्वी दुबईतुन आयात करण्यात आलेला १२ कोटी किंमतीच्या सिगारेटचा साठा जप्त करण्यात आला होता.

## संक्षिप्त...

### शिक्षक व विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणातून दिवाळीची सुट्टी मिळणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई : राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव पाहता शाळा अजूनही बंद आहेत. तरीसुद्धा, शाळा बंद शिक्षण सुरू, अंतर्गत विद्यार्थ्यांना रोज ऑनलाइन शिक्षणाचे धडे शाळांकडून दिले जात असताना या ऑनलाइन शिक्षणात दिवाळीची सुट्टी मिळणार की नाही? असा प्रश्न उपस्थित केला जात होता. त्यावर राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना, शिक्षकांना ऑनलाइन शिक्षणातून दिवाळीची सुट्टी मिळणार असल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी दिली आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशात ऑनलाईन शिक्षण पद्धती अवलंब करण्यात येत आहे. शालेय विद्यार्थी, शिक्षक व पालकही अव्याहतपणे अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत गुंतले आहेत. १५ जूनपासून राज्यातील शिक्षण विभागाने शाळा बंद असल्या तरी शैक्षणिक वर्ष सुरू करून शिक्षण चालू ठेवले आहे.

त्यामुळे दिवाळीचा सण अगदी काही दिवसांवर आला असताना शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांसाठी परंपरागत पद्धतीने मिळणारी सुट्टी या वर्षीही देण्यात येणार आहे. त्या संबंधितांचा निर्णय लवकरच घेण्यात येईल, असं शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी सांगितलं आहे.

अकरावी कॉलेज प्रवेश संदर्भात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, महाभिवक्ता व संबंधित यंत्रणेशी चर्चा करूनच लवकरात लवकर अकरावीच्या कॉलेज प्रवेशाचा मार्ग मोकळा केला जाणार आहे.

अकरावीचे वर्ग सुरू व्हावे, अशी सर्वांचीच इच्छा असून न्यायालयाच्या प्रक्रियेमुळे विलंब होतो आहे. तर दुसरीकडे ऑनलाइन अकरावी वर्गाला विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे.

## केंद्र सरकार देशात हळू-हळू आणीबाणी आणतंय : खा.सुप्रिया सुळे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्याचे सगळे अधिकार काढून घेण्याचे पाप केंद्र सरकार करतेय हे त्यांच्या कृतीतून दिसते असून हे दुर्दैवी आहे. महाराष्ट्र राज्याच्या विकासामध्ये केंद्रसरकार हस्तक्षेप करतेय हे निंदनीय आहे अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी केंद्रसरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. मेट्रो कारशेडबाबत माध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांवर बोलताना खासदार सुप्रियाताई सुळे यांनी जोरदार टीका केली आहे.

खरं तर ती जमीन महाराष्ट्राची आहे. ज्या राज्याची जमीन असते त्यावर पहिला अधिकार हा त्याच राज्याचा असतो. भाजपचे नेते कोणत्या आधारावर टीका करतायत. जमीन महाराष्ट्राची आहे ती विकास कामासाठी वापरली जातेय. या देशात केंद्रसरकार हळूहळू आणीबाणी आणतंय असं चित्र आहे असेही खासदार सुप्रियाताई सुळे म्हणाल्या.

कांजूरमार्गमधील १०२ एकरवर मेट्रो कारशेडचं बांधकाम सुरू झालं आहे. यावरून डीपीआयआयटीनं राज्य सरकारला पत्र पाठवून बांधकाम थांबवण्याच्या सूचना दिल्या आहेत. गुजरात केडरचे अधिकारी असलेले गुरुप्रसाद मोहापात्रा डीपीआयआयटी विभागाचे प्रमुख आहेत. 'जिल्हाधिकारी, एमएसडी आणि एमएमआरडीए यांनी केलेल्या कार्यवाहीमुळे डीपीआयआयटीचं मोठं नुकसान झालं आहे. भारत सरकारच्या हितांचं संरक्षण करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी यासंदर्भात दिलेले आदेश रद्द करावेत, अशी मी विनंती करतो,' असं मोहापात्रांनी पत्रात म्हटलं आहे.

मंदिरांचे टाळे तोडण्याची भाषा मी कधीच ऐकलेली नाही. हे दुर्दैवी आहे, सत्ता नसल्यामुळे कदाचित त्यांना काहीच सूचत नाही, त्यामुळे कदाचित ते बिचारे असे वागत असतील असा टोलाही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी लगावला.

दरम्यान लग्नाचे हॉल्स खुले करण्याची विनंती मी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना केली आहे. टप्प्याटप्प्याने हॉल खुले करा. दिवाळीनंतर हॉल उघडा पण त्याचे बुकींग घ्यायला आता परवानगी द्या. त्यामुळे बॅण्डवाले, केटरर्स यांना दिलासा मिळेल असेही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी सांगितले.

## पोलादपूर तालुक्यातील तीन थेट सरपंच बसले घरी

### नवीन सरपंच निवड- चौथ्या सरपंचाची जागा रिक्तच

**दै.रायगड नगरी । शैलेश पोलादपूर**

**पोलादपूर** : तालुक्यातील गेल्या आठ महिन्यांपासून राजिनामे दिलेले चार ग्रामपंचायतीचे थेट सरपंच पदासह सदस्यपदावरूनही बेदखल झाल्यानंतर याबाबत वृत्तपत्रांनी उठविलेल्या आवाजानंतर तातडीने निवडणुका होऊन सदस्यांमधून तीन नवीन सरपंचांची बिनविरोध निवड झाली असून तीन थेट सरपंच कायमचे घरी बसले आहेत. मात्र, लोहारे येथील सरपंचपदाबाबत अद्याप कोणताही निर्णय न झाल्याने तेथील रिक्त सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांची निवडणूक कधी लागणार, याबाबत सर्वांनाच उत्सुकता निर्माण झाली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये संघटना, पक्षादेश आणि गावकीचे निर्णय हे गेल्या अनेक वर्षांपासून पोलादपूर तालुक्यात प्रभावी ठरत असून विशिष्ट पदासाठी विशिष्ट कालमर्यादा ठरलेला असताना या संकल्पनांमुळे पदांवरील व्यक्तींना त्यांचा कालावधी पूर्ण करण्यापूर्वीच राजिनामे द्यावे लागत आहेत. थेट सरपंच पदासाठी पाच वर्षांचा पूर्ण कालावधी असताना अडीच वर्षे अथवा दोन वर्षे कालावधीचे दोन आणि शेवटच्या एका वर्षासाठी एक असे तीन सरपंच विराजमान केले जात आहेत.

ग्रामपंचायत काटेतळी येथील थेट बिनविरोध महिला सरपंचांसह आठ सदस्य असलेल्या ग्रामपंचायतीच्या सरपंच आरती अजय मोरे यांनी २७ जानेवारी २०२० रोजी राजिनामा दिल्यानंतर तसा

..../२

## श्रीवर्धन शहरात पेटत्या चितेवरील मांस खाणाऱ्या नरभक्षकाला नागरिकांनी दिला चोप

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन शहरातील एक मनोरुग्ण नसलेली व्यक्ती पेटत्या चितेवरील मास खात असल्याची चर्चा गावामध्ये अनेक दिवसांपासून सुरू होती. सदर मनोरूग्ण असलेली व्यक्ती श्रीवर्धन शहरातून अनेक वेळा फिरताना आढळून येते. रात्री-बेरात्री रस्त्यावरती बसणे, तसेच हातामध्ये एक लोखंडी सळी व पाठी वरती एक सिमेंटची रिकामी बॅग घेऊन सदरची मनोरुग्ण व्यक्ती श्रीवर्धन शहरात फिरत असते. तसेच या मनोरुग्णाचे वास्तव्य देखिल श्रीवर्धन येथील मठाच्या स्मशानभूमी जवळ असलेल्या एका शेडमध्ये असते. सकाळी समुद्रावर फेरफटका मारणाऱ्या नागरिकांना अनेक वेळा ही व्यक्ती नग्न अवस्थेत देखील पाहायला मिळते. परंतु मनोरुग्ण असल्याने याकडे अनेक जण लक्ष देत नाहीत.

सदर व्यक्ती बाबत अनेक वेळा हा चितेवरील मास खात असल्याचा नागरिकांना संशय होता. श्रीवर्धन मूळगाव कोळीवाडा येथील एक महिलेचा रविवारी मृत्यू झाला होता. सदर महिलेचे अंत्यविधी करण्यासाठी त्या परिसरातील नागरिक स्मशानभूमीत गेले असता सदर नरमांस खाणारा मनोरुग्ण त्याठिकाणाहून फेऱ्या मारत असल्याचे नागरिकांच्या लक्षात आले होते. मृतदेहाचे दहन करून झाल्यानंतर काही वेळाने त्या ठिकाणी नागरिकांनी पाळत ठेवली होती. सदरची व्यक्ती त्या स्मशानभूमीमध्ये हातातील लोखंडी सळईने चितेवरील मांस काढून खात असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर मूळगाव कोळीवाडा परिसरातील नागरिकांनी सदर व्यक्तीला पकडून चांगला चोप दिला व श्रीवर्धन पोलीस ठाण्यात सदर व्यक्ती विरोधात अर्ज करण्यात आला आहे.

श्रीवर्धन शहरात एकूण पाच स्मशानभूमी आहेत. सदरची मनोरुग्ण व्यक्ती समुद्रावरून कायम फिरत असते व सर्व स्मशानभूमी समुद्रकिनारी असल्याने त्याचे कायम लक्ष असते, की कोणत्या ठिकाणी चिता पेटली आहे. चिता पेटल्यानंतर काही वेळानी ही व्यक्ती त्याठिकाणी जाऊन मांस खात असल्याचा अगोदर सर्वांना फक्त संशय होता, परंतु परवा त्याला प्रत्यक्षात पकडण्यात नागरिकांना यश आले. आता या व्यक्तीबाबत श्रीवर्धन नगरपरिषद व श्रीवर्धन पोलीस कोणती भूमिका घेतात याकडे शहरातील नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

## सर्वांच्या एकत्रीत सहभागातून 'माझी वसुंधरा' अभियान प्रभावीपणे राबवावे : ना.आदित्य ठाकरे

### पुणे आणि कोकण विभागातील नियोजनाचा आढावा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

लोकप्रतिनिधी, विविध विभाग, स्वयंसेवी संस्था, पर्यावरणप्रेमी कार्यकर्ते यांच्यासह लोकसहभागातून 'माझी वसुंधरा' हे अभियानप्रभावीपणे राबविण्यात यावे, असे आवाहन पर्यावरण मंत्री श्री. आदित्य ठाकरे यांनी यावेळी केले.

पर्यावरण रक्षणाच्या अनुषंगाने राज्यात नुकत्याच सुरु करण्यात आलेल्या 'माझी वसुंधरा' अभियानाच्या पुणे आणि कोकण विभागातील नियोजनाची माहिती पर्यावरण मंत्री श्री. आदित्य ठाकरे यांनी दोन्ही विभागातील आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे चर्चा करुन घेतली.

पर्यावरण मंत्री श्री. ठाकरे यांच्यासह पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर, प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव अशोक शिनगारे हे मंत्रालयातून सहभागी झाले होते. पर्यावरण राज्यमंत्री संजय बनसोडे, पुणे विभागीय आयुक्त सौरभ राव, कोकण विभागीय आयुक्त अण्णासाहेब मिसाळ यांच्यासह दोन्ही विभागातील जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदी वरिष्ठ अधिकारी ऑनलाईन सहभागी झाले होते.

पर्यावरण मंत्री श्री. ठाकरे

..../२

## सराईत गुन्हेगाराला झडप घालून पोलिसांनी पकडले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका सराईत गुन्हेगाराला तसेच त्याला दोन वर्षासाठी हद्दपार केले असतानाही पनवेल परिसरात फिरत असताना मिळून आल्याने गुन्हे शाखा कक्ष २ च्या पथकाने झडप घालून पकडले आहे.

गुन्हे शाखा कक्ष २ चे सपोनि कराड, सपोनि गायकवाड, सपोनि ढोले, पो.हवा. साळुंखे, पो.हवा.पवार, पो.हवा.गडगे, पो.हवा. पाटील, पो.ना.कुदळे, पो.ना.कानु असे पथक पनवेल परिसरात गस्त घालीत असताना पोलीस हवालदार साळुंखे यांना खास बातमीदाराकडून माहिती मिळाली की, पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ठाणा नाका परिसरात पनवेलसह नवीमुंबई, रायगड व ठाणे अशा जिल्ह्यातून हद्दपार केलेला गुन्हेगार जाहिद मुस्तफा पावले (२८ रा.पटेल मोहल्ला) हा फिरत आहे. त्यानुसार तातडीने गुन्हेगारांचे कर्दनकाळ असलेले पो.हवा.सचिन पवार यांनी त्या भागात धाव घेवून झडप घालून सदर आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पो.का.कलम १४२ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

## गिर्यारोहणासाठी गेलेल्या तरुणाचा आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील माची प्रबळ येथे गिर्यारोहणासाठी गेलेल्या तरुणाचा मृतदेह आज पनवेल तालुका पोलिसांना व शोध पथकाला कलावंती बुरुजाजवळ आढळल्याने पोदी परिसरात शोककळा पसरली होती.

पनवेल जवळील पोदी-१ येथे राहणारा अनुराग गुडीले (२२) हा शनिवारी मित्रांसोबत गिर्यारोहणासाठी जातो असे सांगून घराबाहेर पडला होता. परंतु त्यानंतर त्याचा संपर्क होत नसल्याने सोमवारी खांदेश्वर पोलीस ठाण्यात या संदर्भात माहिती देण्यात आली होती. त्यानुसार पोलिसांनी त्याच्या मोबाईलचे टॉवर लोकेशन घेतले असता ते माची प्रबळ परिसरात आढळून आले. त्यानुसार सदर हद्द ही पनवेल तालुका पोलिसांची असल्याने विशेष पथक व तरुण वर्ग त्या ठिकाणी शोध घेण्यासाठी गेले असता तेथे त्याचा आज मृतदेह आढळून आला. त्यानुसार सदर घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## सिडको नैना प्रकल्पाला स्थानिक शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असल्याने त्यांना नोटीस न पाठविण्याचे मुख्यमंत्र्यांकडे साकडे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील शेतकऱ्यांचा नैना प्रकल्पाला मोठा विरोध असून त्याबाबत सिडकोला वेळोवेळी सूचना देऊनही सिडको नैना प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नोटीसा पाठवून भयभीत करीत आहे. तरी याकडे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांनी लक्ष घालून या संदर्भात शेतकऱ्यांना बैठकीची वेळ देऊन योग्य मार्गदर्शन करावे. तोपर्यंत सिडकोने अशाप्रकारे नोटीसा पाठवू नये अशा मागणीचे निवेदन पनवेल उरण महाविकास आघाडीचे अध्यक्ष व शिवसेना रायगड जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील यांनी दिले आहे.

या निवेदनात बबनदादा पाटील यांनी म्हटले आहे की, पनवेल तालुक्यातील शेतकऱ्यांचा नैना प्रकल्पाला मोठा विरोध असून त्याबाबत सिडकोला वेळोवेळी सूचना देऊनही सिडको नैना प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नोटीसा पाठवून भयभीत करीत आहे. याबाबत नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर झालेल्या चर्चेनुसार त्यांनी आपल्याशी बैठक घेण्याचे आश्वासन दिलेले आहे. पण दुर्दैवाने कोरोना सारखा महारोग आल्याने आपल्यासोबत ती बैठक होऊ शकली नाही. ८ दिवसांपूर्वी सर्व प्रकल्पग्रस्त समितीचे पदाधिकारी व

..../२

# प्रगतिपथावर ?

देशाची अर्थव्यवस्था केवळ सुधारत नसून, ती मजबूत होत असल्याची आकडेवारी हाती येत असून, केंद्रीय अर्थसचिव अजय भूषण पांडे यांनी त्यास दुजोरा दिला आहे. सरकारच्या वतीने लवकरच नवीन आर्थिक साह्य योजना जाहीर होणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. टाळेबंदी उठवली गेल्याने जनजीवन रुळावर येत गेले आणि अपेक्षेनुसार आर्थिक उलढाली़ंचा वेग वाढला. या वाढत्या उलाढालीचे आकडे गेले तीन महिने हाती येत होते. त्यात अलीकडे नवरात्र; तसेच दसरा या उत्सवकाळात जनतेने भरपूर खरेदी करून, परिस्थिती पूर्वीसारखी सामान्य होत असल्याचे संकेत दिले. गेले अनेक दिवस अर्थमंत्र्यांकडून अजून एक आर्थिक पॅकेज येणार असल्याची चर्चा होती. त्याला अर्थसचिवांनी दुजोरा दिला. हे पॅकेज कधी येणार, ते त्यांनी स्पष्ट केले नसले, तरी मोदी सरकार यासाठी दिवाळीचा किंवा आधीचाही मुहूर्त गाठू शकेल. अर्थव्यवस्थेची प्रकृती दर्शवणारा महत्त्वाचा तपशील जीएसटीच्या आकडेवारीत असतो. केंद्र सरकारकडे ऑक्टोबरमध्ये जमा झालेला कर करोनाकाळात प्रथमच एक लाख कोटी रुपयांच्या पुढे गेला. गेल्या वर्षीच्या याच काळाच्या तुलनेत हे प्रमाण दहा टक्क्यांनी वाढले आहे. विद्युत वापर, निर्यात आणि आयात या क्षेत्रांतही वाढ असल्याचे अर्थसचिवांनी म्हटले आहे; त्यामुळे ही केवळ जनजीवन रुळावर येत असताना झालेली सुधारणा नसून, ती मजबूत, शाश्वतपणे पुढे होणारी वाढ आहे, असा त्यांचा विश्वास आहे. उत्पादन क्षेत्रातील आकडेवारीही या विधानाला पुष्टी देते. कारखान्यांतील उलाढाल 'मॅन्युफॅक्चरिंग पर्चेसिंग मॅनेजर इंडेक्स'द्वारे मोजली जाते. यात ऑक्टोबरमध्ये देशभरातील कारखान्यांत गेल्या दशकभरातील सर्वाधिक वाढ नोंदली गेली; त्यामुळे टाळेबंदीत विशेषत: कारखाने बंद झाल्याने कोलमडलेली व्यवस्था आधीपेक्षा अधिक वेगाने आणि मजबुतीने उभी राहत आहे. ऑक्टोबरमध्ये हा निर्देशांक ५८.९ होता. हा आकडा या आधी मे २०१०मध्ये, म्हणजे दशकभरापूर्वी गाठला गेला होता. याशिवाय, आठ महिन्यांत पहिल्यांदा डिझेलच्या विक्रीमध्ये नोंदवली गेलेली वाढ, हीदेखील अर्थव्यवस्था निश्चितपणे सकारात्मक वळणे घेत असल्याचे द्योतक आहे. जीएसटी भरणा, डिझेल विक्रीत वाढ आणि कारखान्यांकडे नोंदवली गेलेली मागणी हे परस्परपूरक घटक अर्थव्यवस्था प्रगतीच्या दिशेने चालल्याचे सूचित करतात. दसऱ्यानिमित्त देशभरातून गृहोपयोगी, वाहन आणि तत्सम उत्पादनांच्या विक्रीत नोंदली गेलेली वाढ आता कारखान्यांची चाके एकापेक्षा अधिक पाळीत फिरती ठेवेल. ही वाढ अधिक शाश्वत पद्धतीने होत असून, पुढच्या काळातही देशाच्या अर्थकारणाला हातभार लावतच राहील, हा विश्वास त्यातूनच दिसून येतो. अडचणीत असलेल्या उद्योगक्षेत्रांवर केंद्र सरकार नजर ठेवून आहे आणि त्यांना योग्य वेळी, योग्य पद्धतीने मदत देण्याची तयारी करीत आहे, असे अर्थसचिवांच्या मुलाखतीतून स्पष्ट झाले आहे. कारखान्यांवर मागणीचा दबाव वाढत असताना, केंद्राकडून मदत मिळाल्यास दुहेरी फायदा होऊ शकतो; कारण कारखान्यांत काम वाढलेले असले, तरी टाळेबंदीतली नोकरकपात काही त्यांनी मागे घेतलेली नाही. अजूनही काढलेल्या किंवा नव्याने लोकांना कामावर घेतले गेले नाही, असे सर्वेक्षणातून दिसते; त्यामुळे ही केंद्राची मदत रोजगारात वाढ करू शकेल आणि त्यातून निर्माण होणारा पैसा पुन्हा अर्थकारणात येईल. अर्थात, हे सगळे आकडे खरे असले, तरी अजूनही प्रत्यक्ष व्यवहारांमधील परिस्थिती सुधारलेली नाही. सामान्य माणसाला या अर्थव्यवस्थेतील सुधारणांचा फायदा कधी मिळणार, हा प्रश्न उरतोच. सातत्याने आर्थिक वाढ होण्यासाठी नागरिकांच्या खरेदीची ताकद वाढायला हवी. 'फिक्की'च्या अध्यक्ष संगीता रेड्डी यांनीही अर्थव्यवस्था जोरकसपणे पूर्वपदावर येण्यास सज्ज झाली असून, ती आधीपेक्षा अधिक मजबूत झालेली असेल, असे म्हटले आहे. सरकारने घेतलेल्या 'प्राणरक्षक' निर्णयानंतर आता नागरिकांच्या उपजीविकेच्या गोष्टीसाठी सरकारने पावले उचलण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. केंद्र सरकारकडून अपेक्षित असलेले आर्थिक पॅकेज, कारखान्यांच्या उत्पादनात होणारी वाढ आणि लॉकडाउनची बंधने हटल्याने अर्थव्यवस्था पूर्वपदावर येणे, या गोष्टी सुस्पष्ट वाढ होत असल्याचे दर्शवतात. अर्थात, यातून आपण अपेक्षित करतो तशी मजबूत अर्थव्यवस्था साध्य होईल का, हे आत्ताच सांगता येणार नाही. अर्थव्यवस्थेत खर्च व खरेदीला प्रोत्साहन देण्यासाठी सध्या कमी झालेल्या व्याजदरांचा वापर करून घेता येतो हे खरे; परंतु त्याचे हप्ते भरण्याची हमी मिळणेही महत्त्वाचे असते. त्यासाठी केवळ देशांतर्गत विचार करून चालणार नाही, तर आंतरराष्ट्रीय व्यापाराकडे पाहावे लागेल. विशेषत: चीनच्या आर्थिक धोरणाकडे लक्ष द्यावे लागेल. चीनने आपल्या पंचवार्षिक योजनेत पुढच्या पंधरा वर्षांत वार्षिक दरडोई सरासरी उत्पन्न हे तीस हजार डॉलरच्या पुढे नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. चीनने पुढील विकासासाठी आणि विस्तासाठी वर्तमान अर्थसंरचना पुरेशी नसून, त्यासाठी नव्या पद्धती अमलात आणाव्या लागतील, यावर जोर दिला आहे. पुढील आर्थिक वाढ ही संपूर्णत: उच्च तंत्रज्ञानावर आधारित, भविष्यवेधी असणार आहे. आपला चीनशी सुरू असलेला संघर्षही याच संदर्भात लक्षात घ्यायला हवा. अमेरिकेतील अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या निकालातून आर्थिक पातळीवर खास फरक पडेल, असे नाही. आपण सध्या टिकून राहण्याची आणि जनजीवन पूर्वपदावर येण्याची लढाई लढत आहोत. ती लढतानाच दीर्घकालीन मजबूत अर्थव्यवस्थेचा विचार व्हायला हवा.

# उरणमध्ये सिडकोच्या माध्यमातून लवकरच सुरु होणार डेडीकेटेड कोव्हीड हेल्थ सेंटर

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र राज्यावर आलेल्या जीवघेण्या कोरोना महामारीचा संकट त्याचा प्रादुर्भाव उरण मध्ये देखील होत असून रुग्णांना उपचारासाठी नवी मुंबई व मुंबई येथे जावे लागत आहे. अनेक वेळा नवी मुंबई व मुंबई येथे बेड उपलब्ध होत नाही त्यामुळे उपचाराअभावी रुग्णांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

त्याच अनुषंगाने ०२ नोव्हेंबर २०२० रोजी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी मा.जिल्हाधिकारी रायगड यांच्यासोबत बैठक घेऊन सदर विषयावर चर्चा केली असून, लवकरच उरण मध्ये सिडकोच्या माध्यमातून डेडीकेटेड कोव्हीड हेल्थ सेंटर सुरु होणार असल्यामुळे उरण मधील नागरिकांना आता नवी मुंबई व मुंबई येथे उपचारासाठी जावे लागणार नाही. उरण मध्येच सिडको ट्रेनिंग सेंटर, बोकडविरा येथे आता रूग्णांवर उपचार होणार आहेत.त्यामुळे कोरोना मुळे त्रस्त व्यक्तींना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे.

या बैठकीवेळी सोबत सिव्हील सर्जन रायगड, डी.एच.ओ. रायगड, तहसिलदार उरण, सिडकोचे डॉ.बाविसकर, शिवसेना तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील, कामगार नेते महादेव घरत, डॉ.मनोज भद्रे, डॉ.मोरे, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार, उपतालुका संघटक सुधीर पाटील, उपस्थित होते.

## महाराष्ट्र नवनिर्माण सेना रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या रायगड उपजिल्हा संघटकपदी यतीन देशमुख यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मराठीहृदय सम्राट राज ठाकरे यांच्या आशिर्वादाने तसेच रायगड जिल्हाध्यक्ष अतुल भगत यांच्या मार्गदर्शनाने मनसे रोजगार व स्वयंमरोजगारच्या रायगड उपजिल्हा संघटकपदी तरुण तडफदार नेतृत्व यतीन देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र अध्यक्ष महेंद्र बैसाणे आणि जिल्हा संघटक रामदास पाटील यांच्या हस्ते यतिन देशमुख यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या रायगड उपजिल्हा संघटक पदीचे नियुक्ती पत्र देण्यात आले आहे. याबद्दल मनसेसह इतर पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## गुरुवारी जिल्हा भाजप महिला मोर्चाची आढावा बैठक तसेच नियुक्तीपत्र प्रदान कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उत्तर रायगड जिल्हा भाजप महिला मोर्चाची आढावा बैठक तसेच नियुक्तीपत्र प्रदान कार्यक्रम गुरुवार दिनांक ०५ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा अध्यक्षा उमाताई खापरे यांच्या अध्यक्षतेखाली आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत पनवेलमध्ये आयोजित करण्यात आला आहे.

मार्केट यार्ड मधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमास महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चाच्या उपाध्यक्षा व कोकण विभाग प्रभारी नीलम गोंधळी, प्रदेश सरचिटणीस अश्विनी जिचकर, यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा आश्विनी पाटील, सरचिटणीस दर्शना भोईर, मृणाल खेडकर यांनी दिली असून या कार्यक्रमाला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन केले आहे.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

## मौजे देवघर मधील मुस्लिम समाज दफनभूमीसाठी जागेचे हस्तांतरण आदेश जारी

### पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या संवेदनशीलतेने महत्वाचा प्रश्न लागला मार्गी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वरंडेमधील मौजे देवघर येथील मुस्लिम समाजाची दफनभूमीकरिता जागा मिळावी, अशी अनेक वर्षांपासून मागणी होती. मुस्लिम समाजाच्या या मागणीचे

गांभीर्य ओळखून पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी तात्काळ जिल्हा प्रशासनाकडून याबाबत सविस्तर माहिती घेतली.

त्यानुसार जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या आदेशान्वये मौजे देवघर येथील मुस्लिम समाजाकरिता १ हेक्टर आर जमीन दफनभूमीकरिता राखीव ठेवण्याचे आदेश नुकतेच जारी करण्यात आले आहेत. पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या संवेदनशीलतेमुळे जिल्ह्यातील एक महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागला आहे.

## नागपाडा येथील व्यापारी वर्गांना नुकसान भरपाई देण्याची पुखराज सुथार यांची महाराष्ट्र शासनाकडे मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

दि २२ ऑक्टोबर २०२० रोजी सिटी सेंटर मॉल, नागपाडा, मुंबई सेंट्रल येथे लागलेल्या आगीमुळे व्यापारी वर्गाचे प्रचंड नुकसान झाले आहे. तेथील व्यापारी वर्ग आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने या व्यापारी वर्गांना आर्थिक नुकसान भरपाई देऊन त्यांना मदतीचा हात द्यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे रायगड जिल्हा सरचिटणीस पुखराज सुथार यांनी मुख्यमंत्री उद्धवसाहेब ठाकरे, खासदार शरद पवार, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे एका निवेदनपर पत्रव्यवहाराद्वारे केली आहे.

दि २२ ऑक्टोबर २०२० रोजी सिटी सेंटर मॉल, मुंबई सेंट्रल येथे रात्रीच्या वेळेस अचानक लागलेल्या आगीमुळे सदर मॉल संपूर्ण जळाले आहे. व आगीमुळे सिटी सेंटर मॉल मध्ये असलेल्या दुकानदारांचे प्रचंड व कधीही भरून न निघणारे नुकसान झाले आहे. बहुतेक सर्वच दुकानदारांची संपूर्ण जमा पुंजीच यात कामी येऊन त्यांचा जगण्या मरण्याचा प्रश्न त्यांच्यासमोर उभा आहे. या सर्व पार्श्वभूमीवर सहानुभूतीपूर्वक विचार करून सिटी सेंटर मॉल, मुंबई सेंट्रल येथील त्रस्त व्यापारी वर्गाला त्यांचा नुकसान भरपाई भरून काढण्यासाठी सरकारने पंचनामे करून विशेष आर्थिक योजना जाहीर करावी व आगबाधित व्यापारी वर्गाला यथा संभव सर्वतोपरी मदत करावी अशी विनंती तथा मागणी पुखराज सुथार यांनी महाराष्ट्र शासनाकडे पत्रव्यवहाराद्वारे केली आहे.

## डॉ. नरेंद्र दाभोळकर अंधश्रद्धा निर्मूलन कार्याचे दिपस्तंभ : अविनाश पाटील

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

अंधश्रद्धा निर्मूलनाच्या संघटित कामाचा आदर्श वस्तुपाठ डॉ. नरेंद्र दाभोळकरांनी घालून दिला. ते अंधश्रद्धा निर्मूलन कार्याचे दीपस्तंभ आहेत. असे प्रतिपादन अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष अविनाश पाटील यांनी केले. महा. अंनिसच्या वतीने शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या जन्मदिनी रविवारी (ता.१) आयोजित ऑनलाइन राज्यव्यापी निर्धार मेळाव्यात ते बोलत होते. त्यांनी कार्यकर्त्यांना वारसाहक्क व घराणेशाहीचा प्रभाव कार्यकर्त्यांनी झुगारून देण्याचे आवाहन देखील केले.

## काशिनाथ शंकर केरेकर यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने सत्कार

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील गोडाऊन किपर तसेच अधीक्षक कार्यालयातील शिपाई पदावर कार्यरत असलेले काशिनाथ शंकर केरेकर हे मागील ३७ वर्षांपासून अत्यंत इमानेइतबारे आपले कर्तव्य पार पाडत होते. दि.३१ ऑक्टोबर रोजी सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचा छोटेखानी सत्कार समारंभ नुकताच प्रसादभाई जनसंपर्क कार्यालयात शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी नगरपरिषदेचे गटनेते प्रसाद सावंत, माजी नगरसेवक अवधूत येरफुले,विवेक केरेकर, अमोल सोनवणे यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

काशीनाथ केरेकर यांचा सर्वांशी आपुलकीने आणि प्रेमळ स्वभाव असल्याने अधीक्षक कार्यालयात कुणीही सर्वसामान्य नागरिक अथवा अशिक्षित व्यक्ती काही कामानिमित्त आल्यास त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे महत्वपूर्ण कार्य त्यांच्या कार्यकाळात केल्यामुळे त्यांचा इथल्या नागरिकांना शासकीय कामासाठी एक आधार होता.कामानिमित्त येणाऱ्या लोकांची त्यांनी या अनेकदा कामे केली आहेत.आपल्या ३७ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्यावरइथल्या अशिक्षित आणि सर्वसामान्य लोकांची कामे कोण करणार यामुळे त्यांनाही एकप्रकारे उणीव भासत असल्याचे केरेकर यांनी सांगितले.यावेळी प्रसाद सावंत यांसह उपस्थितांनी त्याना पुढील निरोगी दिर्घआयुष्य साठी शुभेच्छा दिल्या.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पोलादपूर तालुक्यातील तीन थेट सरपंच बसले घरी

अहवाल २४ फेब्रुवारी २०२० रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात आला. बहुचर्चित सरपंचांसह १० सदस्यीय लोहारे ग्रामपंचायतीचे सरपंच किसन दगडू पारकर यांनी दि. २ मार्च २०२० रोजी दिलेल्या राजिनाम्याबाबत ८ मे २०२० रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे अहवाल देण्यात आला. उमरठ येथील सरपंचांसह ८ सदस्यीय ग्रामपंचायतीचे सरपंच एकनाथ गोपाळ कळंबे यांनी २४ जून २०२० रोजी राजिनामा दिल्यानंतर १३ ऑगस्ट २०२० रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे अहवाल देण्यात आला तर सरपंचांसह आठ सदस्यीय ओंबळी ग्रामपंचायतीमध्ये शशिकांत सहदेव चिकणे यांनी १४ जुलै २०२० रोजी राजिनामा दिल्याचा अहवाल ११ ऑगस्ट २०२० रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात आला. मात्र, या रिक्त सरपंच पदांबाबत रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य चंद्रकांत कळंबे यांनी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये ग्रामपंचायत उपमुख्याधिकारी रायगड जिल्हा परिषद आणि अन्य अधिकाऱ्यांसोबत चर्चा केल्यानंतर याप्रश्नी आता राज्यसरकारचाच अभिप्राय मागविण्याचा निर्णय झाला. यापैकी लोहारे ग्रामपंचायतीचे थेट सरपंच पद काही वादग्रस्त विषयांनंतर राजिनामा दिल्याने रिक्त झाले असून यावेळी एका सदस्यानेदेखील राजिनामा सादर केल्यानंतर मंजूर झाल्याने या ग्रामपंचायतीबाबतचा निर्णय अद्याप होऊ शकला नाही.

लोहारे ग्रामपंचायत वगळता उर्वरित ओंबळी, काटेतळी आणि उमरठ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदांसाठी सदस्यांमधून निवडणूक प्रक्रिया दि. १५ ऑक्टोबर २०२० रोजी घेण्यात आली. त्यानुसार काटेतळी ग्रामपंचायतीच्या सदस्यांमधून सौ.नंदा प्रदीप मोरे, ओंबळी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी शशिकांत लक्ष्मण चिकणे आणि उमरठ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी चंद्रकांत गजानन कळंबे यांची बिनविरोध निवडणूक झाली असल्याची माहिती पोलादपूर पंचायत समितीचे गट अ गटविकास अधिकारी धनंजय जगताप यांनी दिली आहे.

## अभियानप्रभावीपणे राबवावे : ना.आदित्य ठाकरे

म्हणाले की, अनियमीत पाऊस, निसर्गसारखी वादळे ही संकटे हवामानातील बदलामुळे निर्माण झालेली आहेत. अशी संकटे निर्माण होऊ नयेत यासाठी पर्यावरण रक्षणाशिवाय दुसरा उपाय नाही. त्यामुळे येत्या काळात 'माझी वसुंधरा' अभियानातील सर्व घटकांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. याची सुरुवात शासकीय कार्यालयांमधून करण्यात यावी. शासकीय कार्यालयांमधील उर्जा वापराचे, पाणी वा-पराचे लेखापरिक्षण, कचऱ्याचे व्यवस्थापन, साधनसामुग्रीचे व्यवस्थापन, अडगळीतील सामानाचे व्यवस्थापन, कार्यालय परिसरातील वृक्षाच्छादन आदी बाबींवर काम करण्यात यावे. तसेच सर्वांनी आपल्या प्राधान्यक्रमात या अभियानाचा समावेश करावा, असे आवाहनही श्री.ठाकरेयांनी केले.

पर्यावरण राज्यमंत्री श्री. संजय बनसोडे म्हणाले की, भावी पिढीलास्वच्छ हवा, शुद्ध पाणी आणि मुबलक उर्जा देणे हे आपले कर्तव्य आहे. यासाठी पर्यावरणाच्या विविध घटकांचे संरक्षण आणि संवर्धन करणे आवश्यक आहे. सर्वांनी समन्वयाने 'माझी वसुंधरा' अभियान प्रभावीपणे राबवून महाराष्ट्रास पर्यावरण रक्षणाच्या चळवळीत अग्रभागी ठेवावे, असे आवाहन श्री.बनसोडे यांनी केले.

पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती मनिषा म्हैसकर म्हणाल्या की, स्वच्छता अभियान, जलसंधारण, सौरऊर्जा अशा विविध योजनांच्या अभिसरणातून विविध उपक्रम राबवून 'माझी वसुंधरा' अभियानाला गती देण्यात यावी. डीपीडीसी, वित्त आयोग, सीएसआर, सीईआर आदींमधून निधी उपलब्ध करुन विविध उपक्रम राबविता येतील. सर्वांनी प्राधान्यक्रमाने हेअभियान राबवावे, असे आवाहन त्यांनी केले.

विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अभियानाच्या अंमलबजावणीसाठी त्यांच्या भागात करण्यात आलेले नियोजन आणि प्रस्तावित विविध उपक्रमांची माहिती दिली. अभियानामध्ये स्वयंसेवी संस्था, एनसीसी, एनएसएस यांचा सहभाग घेणे, नद्यांची स्वच्छता करणे, जैवविविधता जपणे, हरितपट्टे तयार करणे, कचऱ्याचे विलगीकरण, सायकल ट्रॅक निर्मिती, देशी झाडांचे रोपण, अर्बन फॉरेस्ट तयार करणे, सायकल शेअरींग, मियावाकी पद्धतीने वृक्षारोपण, कांदळवनांचे जतन-संवर्धन, शहरांमधील धूळ कमी करण्याचे नियोजन, गृहनिर्माण सोसायट्यांमधील कचऱ्याचे व्यवस्थापन, नदी, तलाव, नाल्यांचे पुनरुज्जीवन, सिमेंट रस्त्यांजवळील झाडांचे डी-चौकींग करणे आदी विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली.

## नोटीस न पाठविण्याचे मुख्यमंत्र्यांकडे साकडे

खासदार श्रीरंग बारणे यांच्यासोबत सिडकोचे एमडी डॉ. संजय मुखर्जी यांची भेट घेऊन नैना प्रकल्पाला विरोधा संदर्भात बाजू मांडली होती. तरी सिडकोचे नियोजन विभाग अधिकारी नोटीसा पाठवून शेतकऱ्यांकडून एकरी बेटरमेंट चार्जेस म्हणून कोरोडो रूपयांची मागणी करीत आहे. तरी यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालून लवकरात लवकर बैठक लावावी. त्याचप्रमाणे सदर बैठक होईपर्यंत कोणत्याही प्रकारची नोटीस व कारवाई शेतकऱ्यांवर होऊ नये अशी त्यांनी विनंती केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक: **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## मारहाण करून पसार झालेल्या आरोपीस केले गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मारहाण व गंभीर दुखापत करून पसार झालेल्या आरोपीस गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलच्या पथकाने गजाआड केले आहे.

सदर गुन्ह्यातील फिर्यादी हा आरोपी सोबत दारु पित असताना त्यांच्यात झालेल्या आपसातील वादामुळे आरोपीने फिर्यादी याला मारहाण व गंभीर दुखापत करून तो पसार झाला होता. याबाबत गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलचे सपोनि कराड, सपोनि गायकवाड, सपोनि ढोले, पो.हवा.साळुंखे, पो.हवा.पवार, पो.हवा.गडगे, पो.हवा.पाटील, पो.ना.कुदळे, पो.ना.कानु समांतर तपास करीत असताना पोलीस हवालदार रणजित पाटील यांना मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने आरोपीला कर्नाळा स्पोर्टस् रोडवरील कळंबोली ते टी पॉईंट हायवे जवळ सापळा रचून ताब्यात घेतले आहे.

## घरफोडीत हजारो रुपये किंमतीचा ऐवज लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एक बंद दुकानाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्यांनी केलेल्या घरफोडीत हजारो रुपये किंमतीचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे.

कामोठे वसाहतीमधील सेक्टर २१ येथे मोहनभाई रुदानी यांचे पाण्याच्या मोटार रिपेअरिंग करण्याचे दुकान आहे. त्यांच्या बंद दुकानाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्यांनी दुकानात असलेले बुश ब्रासचे ९ बॉक्स, आर कंपनीचे अनमोल कॉपर वायर व गॅस सिलेंडर असा मिळून जवळपास ७ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेला आहे. याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## विवाहिता बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घरी आणलेले खेकडे तिच्या आईकडे देण्याकरिता गेलेली विवाहिता अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

अंकिता मयुर मोकल (२३ रा.केळवणे), उंची ५ फूट २ इंच, रंग गोरा, बांधा जाड, चेहरा उभट, नाक सरळ, केस मध्यम कुरळे काळे लांब, डोळे लहान काळे, गळ्यात दोन वाट्यांचे छोटे मंगळसुत्र, कानात फॅन्सी कानातले, सोबत सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन असून अंगात नेव्ही रंगाचा टॉप व सफेद रंगाचा पायजमा सोबत गुलाबी रंगाचा रत्नमणी ज्वेलर्सची कापडी पिशवी आहे. तिला मराठी, आगरी, कोळी भाषा बोलता येते. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२४४४ किंवा पोलीस हवालदार सुनील गायकवाड यांच्याशी संपर्क साधावा.

Shri.Bhakare Judge Court

Adv. K. P. SAYED
ADVOCATE

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF HON'BLE JT. CIVIL JUDGE (S. D.) COURT AT PANVEL

Misc. Application No.527 of 2020
Exh No.7/D
Next Date : 16/12/2020

Mr. Asif Giyasuddin Mukadam
through bis Constituted Attorney
Mr. Giyasuddin Fakir Mohamed Mukadam
Age 78 years, Occupation-Nil,
having address at Flat No.303, 3 rd floor,
Building No.B-2, Safal Complex, Plot No.17,
Sector-19A, Nerul (East), Navi Mumbai 400706
...Applicant

Verses

1) Mr. Giyasuddin Fakir Mohamed Mukadam
Age 78 years, Occupation- Nil
2) Mrs. Shaheen Iqbal Parkar
Ago 46 years, Occupation- Housewife
Both are residing at Flat No.303, 3rd floor,
Building No.B-2, Safal Complex, Plot No.17,
Sector-19A, Nerul (East), Navi Mumbai 400706
...Opponents

Whereas the above named Applicant has filed an application for Heirship certificate in respect of property mentioned in schedule hereunder written which stands joint names i e. Applicant and deceased late Mrs Aisha Giyasuddin Mukadam Flat No.802. on the 8th Floor, Shree Krishna Tower, Plot No. 18, Sector-19, Kamothe, Phase-II, Navi Mumbai, Taluka-Panvel, Dist Raigad, admeasuring 84.76 Sq Mtrs. Built-up area. Deceased late Mrs. Aisha Giyasuddin Mukadam died on 18/06/2020 at Sector-19A, Nerul, Navi Mumbai. leaving behind the aforesaid Applicant and Opponents as legal heirs.

If anyone has any right, share, claim in the above said Property should appear in person or through their advocates within 30 days from the date of publication of this notice, if no one appear and object the application, this court will proceed to pass the necessary orders.

**SCHEDULE OF PROPERTIES**

Name of deceased: Mrs. Aisha Giyasuddin Mukadam 50% shares left by deceased in following property;

Flat No.802, on the 8th Floor, Shree Krishna Tower, Plot No.18, Sector-19, Kamothe, Phase-II, Navi Mumbai, Taluka-Panvel, Dist. Raigad, admeasuring 84.76 Sq. Mtrs. Built-up area.

GIVEN UNDER MY HAND AND SEAL OF THE COURT On this 03 day of November 2020.

Sd/-
Jr.Clerk
S.D.Civil Court Panvel

Court Seal

Sd/-
Assit.Superitended
S.D.Civil Court Panvel

# कचेरीरोड एक समस्या रस्त्यावरील खोड धोकादायक ; हलगर्जीपणाचा कळस

**दै.रायगड नगरी । रवींद्र कुवेसकर**

**उतेखोल/माणगाव** : नगरपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष, येणारे जाणारे जबाबदार अधिकारीही मुग गिळून गप्प ! मंगलमुर्ति नागरी वसाहती जवळ वर्दळीच्या कचेरी रस्त्याच्या कडेवर झाडाचे खोड अनेक दिवसांपासून धोकादायकपणे पडून आहे. सुदैवाने या ठिकाणी अपघात झाला नाही. मात्र हा हलगर्जी पणाचा कळस असुन अपघाती सापळाच या ठिकाणी लावला आहे काय ? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. कचेरी रोड आणि वाहतुक कोंडी या अत्यंत महत्वाच्या समस्येचा माणगांवकर नेहमीच सामना करत आहेत.

नेमके काय कारण असावे ज्यामुळे हा मोठा अडथळा काढण्यात येत नाही. संबंधित नगरपंचायत प्रशासनानही दुर्लक्ष करतय. याबाबत माहीती घेतली असता हे झाड तोडणाऱ्यांनी बाजूला उचलुन ठेवावे असे बोलले जाते अजूनही कोणाच्या आदेशाची प्रतिक्षा या ठिकाणी हे रस्त्यात पडलेले खोड उचलण्यासाठी केली जात आहे ? असा सवाल ऐरणीवर आला आहे. जर दुर्दैवाने या ठिकाणी अपघात झालाच तर जबाबदार दोषींवर गुन्हा दाखल करुन कठोर कारवाई करावी अशा प्रकारे जनतेमधुन चिड व संतापाची भावना व्यक्त होत आहे.

बहुपयोगी कचेरीरोड वरुन आबालवृध्द, शालेय विद्यार्थी, महिलांना चालणे देखिल मुश्किल, या रस्त्यावर फुटपाथ नाही. रस्त्यालगत बांधलेली गटारे अडचणीची झाल्याचे लोक बोलतात. वाहतुक कोंडीची मोठी समस्या या ठिकाणी असुन अशा प्रकारे कृत्रीम व हलगर्जीपणा व दुर्लक्षामुळे निर्माण झालेले अडथळे तातडीने दुर करीत पार्कींग तसेच वाहनांसाठी एकेरी मार्ग ( वनवे ) सारखी नियमावली संबंधित नगरपंचायत, पोलीस, तहसिल, प्रांत प्रशासन व लोकप्रतिनिधी, पत्रकार, सामाजिक संस्था, व्यापारी संघटनानी एकत्रित वैचारीक मंथनातून संवाद साधुन लक्षपूर्वक उपाय योजना करुन ही समस्या तातडीने सोडवावी असे माणगांवकरांचे म्हणणे आहे.

# कर्जत तालुक्यात काँग्रेस पक्षात नवनियुक्त्या जाहीर

**दै.रायगड नगरी । कर्जत**

लॉकडाऊन नंतर आलेली मरगळ झटकण्यासाठी सगळेच पक्ष, संघटना पुन्हा एकदा जोमाने कामाला लागले आहेत. कर्जत येथे भारतीय काँग्रेस पक्षाची नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीत पक्षात नवनियुक्त्या जाहीर करून काही प्रवेश देखील करण्यात आले. या बैठकीतून मरगळ झटकून तालुक्यात पक्षाला नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे.

भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी व कर्जतचे माजी आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे (अण्णा) यांच्या पुण्यस्मरणानिमित्त कर्जत येथे अभिवादन कार्यक्रम व कर्जत तालुका काँग्रेसची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी पक्षामध्ये नवनियुक्त्या करून त्या जाहीर करण्यात आल्या. यामध्ये नेरळ जिल्हा परिषद वॉर्ड अध्यक्ष पदी फईम अढाळ, कर्जत विधानसभा युवक काँग्रेस चिटणीस पदी कमलाकर पाटिल, नेरळ शहर आदिवासी अध्यक्ष पदी जगन्नाथ शेंडे, खांडस पंचायत समिती अध्यक्ष पदी मंगल माळी यांची नियुक्ति करण्यात आली. तर पक्षाच्या जुन्या जाणत्या कार्यकर्त्या व महिलांमध्ये दांडगा जनसंपर्क असलेल्या दिपाली पाटिल यांची कर्जत तालुका महीला अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. महिला जिल्हाध्यक्ष ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व दीपाली पाटील यांच्या नेतृत्वाखाली काही महीलांनी यावेळी पक्ष प्रवेश देखील केला. मध्ये सुवर्णा आजगावकर, कुल्सम गोलंदाज आदी महिलांनी पक्षात प्रवेश केला.

यावेळी रायगड जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्षा श्रद्धाताई ठाकूर, जिल्हा इंटक अध्यक्ष किरीट पाटील, जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष हेमराज म्हात्रे, कर्जत विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष सागर परदेशी, माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, कर्जत विधानसभा युवक काँग्रेस सोशलमिडीया अध्यक्ष अजिंक्य गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष सागर सुखदरे,जिल्हा सरचिटणीस तमसील भाईजी, पनवेल विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष विश्वजीत पाटील, नेरळ शहर युवक काँग्रेस अध्यक्ष यतिन यादव,युवा कार्यकर्ते रविश पोंजेकर,खोपोली शहर अध्यक्ष रिचर्ड जॉन, माजी नेरळ शहर अध्यक्ष अरविंद कटारिया यांसह सोशल डिस्टनसिंगचे पालन करत कार्यकर्ते उपस्थित होते.

# ओबीसी आरक्षण वाचवावे यासाठी ओबीसींचे सरकारला निवेदन

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

मराठा आरक्षणामुळे ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागणार असून ओबीसींचे आरक्षणाला कुठल्याही प्रकारे धक्का लागू नये अशी मागणी ओबीसी बचाव संघर्ष समितीने केली आहे. ओबीसींच्या नेत्यांनी यासाठी राज्यभरात आंदोलन करण्यात आली. उरण तालुक्यात देखिल अशा प्रकारचे आंदोलन करण्यात आले.

मराठा आरक्षणामुळे ओबीसींच्या आंदोलनाला धक्का बसणार असून त्यामुळे ओबीसी विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे. मराठा समाजाचे महाराष्ट्रात प्राबल्य असून अनेकांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भूषविले आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेत २०० च्या वर मराठा समाजाचे आमदार आहेत. या आमदारांच्या दबावाला बळी पडून हे सरकार ओबीसींच्या विरोधात निर्णय घेण्याची शक्यता आहे. त्यामुळे ओबीसींचे नुकसान होणार आहे. या वेळी ओबीसी सेलचे राजाराम पाटील, शेकापचे ज्येष्ठ नेते काका पाटील, पंचायत समितीचे सभापती सागर कडू, उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, शेकापचे तालुका चिटणीस मेघनाथ तांडेल, महिला आघाडीच्या सिमा घरत,नाहिदा ठाकूर सह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल हे सिडको लि.यांच्याकडून पुनर्वसन व पुनस्थापनेकरिता विकसित भूखंड वितरित योजनेंतर्गत खालील वर्णनाच्या संपादीत घर मिळकतीपोटी मिळणारा भूखंड मुळ शेतकऱ्यांकडून विकसनाकरिता (५०:५०) तत्वावर घेतलेला आहे. सदर संपादीत घर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट नं. | गाव | सर्व्हेक्षण बांधकाम नं. | घर मिळकत नं. | बांधकामाचे एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| VOV-ICOGD-160 | ओवळे | VO-257 | १२२ | १३५.६३ चौ.मी. |

श्री.रोशन प्रकाश म्हस्कर, श्रीमती.कुसुम प्रकाश म्हस्कर व श्री.राकेश प्रकाश म्हस्कर सर्व रा.मु.पो.वरचे ओवळे, पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड यांना वर नमूद केलेल्या घर मिळकतीच्या संपादनापोटी सिडको लि.यांच्याकडून पुनर्वसन व पुनस्थापना योजनेनुसार शासन धोरणानुसार मुळ शेतकरी यांना सिडकोकडून मौजे : पुष्पक नोड (वडघर), ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड नं.३०३, सेक्टर नं.१, क्षेत्र ४१० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड वितरित झालेला आहे. सदर भूखंडाबाबत वरील मुळ शेतकऱ्यांनी आमचे अशिलांबरोबर भूखंड विकसनाचा करारनामा करणार असून सदर करारानुसार वर नमूद भूखंड मुळ शेतकऱ्यांकडून आमचे अशिल विकसनाकरिता नोंदणीकृत विकसन कराराने हस्तांतरीत करून घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर भूखंडावर अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क व हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर भूखंडाचे विकसनाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांक : ०४/११/२०२०

**सही/-**
**ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे**
**१४६, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजी मार्केट, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९८९२२२२२५७**

मा.पाठक सो
वारसाचं सर्टिफिकेटबद्दल जाहीर नोटीस

ॲड.मानस मोहंती व
ॲड.योगिनी भराडे मोहंती
अर्जदार यांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्र.४१८/२०२०
नि.नं.७/ड
ने.ता.२६/११/२०२०

१) श्रीमती.विमल नामदेव भालेराव
वय : ६१ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.संतोष नामदेव भालेराव
वय : ४४ वर्षे, धंदा : नोकरी
३) दिपक नामदेव भालेराव
वय : ४२ वर्षे, धंदा : नोकरी
वरील १ ते ३ रा.हनुमान मंदिर,
टी.जी.१४६, हनुमानपाडा, शिवाजी टेकडी,
मुलुंड कॉलनी, मुंबई, महाराष्ट्र-४०००८२
४) श्रीमती.ज्योती राजू शिंदे
वय : ४३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.जेटवण बुद्ध विहार, प्लॉट नं.३०/सी/८
बैंगणवाडी, गोवंडी, मुंबई, महाराष्ट्र-४०००४३ अर्जदार

विरुद्ध

निरंक सामनेवाला

वरील अर्जदार १) श्रीमती.विमल नामदेव भालेराव, यांचे पती २) संतोष नामदेव भालेराव, ३) दिपक नामदेव भालेराव, व ४) श्रीमती.ज्योती राजू शिंदे, यांचे वडील कै.नामदेव भाऊ भालेराव यांचे दिनांक २२/११/२००४ रोजी, हिरा मांघी नवनीत हॉस्पिटल, मुलुंड येथे निधन झाले. यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-

**मालमत्तेचे वर्णन**

**फ्लॅट नं.१०५, पहिला मजला, प्रेम निवास, प्लॉट नं.ए-१४, सेक्टर नं.१२, खारघर, नवी मुंबई-४१०२१०, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, महाराष्ट्र.**
**क्षेत्रफळ २९० चौ.फूट कारपेट एरिया**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.३/११/२०२० रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# गरजवंत विद्यार्थ्याला प्रसाद सावंत यांच्याकडून मदतीचा हातभार

**दै.रायगड नगरी । मुकुंद रांजाणे**

**माथेरान** : सध्या सर्वत्र ऑनलाइन शिक्षण पद्धती सुरू असल्याने माथेरान मधील एका गरजवंत कुटुंबातील विद्यार्थ्याला माथेरान नगरपरिषदेचे गटनेते तथा बांधकाम सभापती प्रसाद सावंत यांनी येथील सोफिया यासील( मुन्ना ) शेख या विद्यार्थ्याला ऑनलाइन अभ्यासक्रमासाठी मोबाईल भेट देऊन सहकार्याची भूमिका पार पाडली आहे.

मागील आठ महिन्यांपासून लॉक डाऊनच्या काळात केवळ पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या स्थानिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले होते.त्यातच शैक्षणिक पद्धती सुध्दा ऑनलाइन केल्यामुळे अत्यंत हलाखीची परिस्थिती असलेल्या सोफिया या विद्यार्थ्याच्या घरात मोबाईल नसल्यामुळे शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करता येत नव्हता ही बाब येथील सामाजिक कार्यकर्ते अजमुद्दीन नालबंद यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी याबाबत माथेरान नगरपरिषदेचे गटनेते तथा बांधकाम सभापती प्रसाद सावंत यांना सांगितले त्यावरून ताबडतोब प्रसाद सावंत यांनी चांगल्या प्रतीचा एक मोबाईल सोफिया या विद्यार्थ्याच्या घरी जाऊन सुपूर्द केला आहे. यावेळी माजी बांधकाम सभापती शकील पटेल यांसह नगरसेवक नरेश काळे, अजमुद्दीन नालबंद, राजेश काळे, समीर पन्हाळकर, उमेश सावंत आदी उपस्थित होते. मागील काळात सुद्धा प्रसाद सावंत यांनी गरजवंत नागरिकांच्या मागणीनुसार जवळपास पंधरा मोबाईल भेट दिलेले आहेत.गरजवंत विद्यार्थ्यांना नेहमीच शैक्षणिक क्षेत्रात लागणारे साहित्य प्रसाद सावंत हे देत आहेत.त्यामुळेच त्यांच्या निस्वार्थी कार्यपद्धतीवर नागरीक समाधान व्यक्त करीत आहेत.

अर्जदाराचे वकील
ॲड.मेहबुब गै.पटेल

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.३९१/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.०९/१२/२०२०

१) श्रीमती.चंद्रभागा श्रीपत शिंदे
वय : ८५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.अे/३५/१० चंद्रभागा ओनर्स असोसिएशन
सेक्टर १३, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.आनंद श्रीपद शिंदे
वय : ६६ वर्षे, धंदा : काहीनाही
रा.सी./१०२, जसदनवाला कॉम्प्लेक्स,
विश्राळी नाका, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.कैलास श्रीपत शिंदे
वय : ६२ वर्षे, धंदा : निवृत्त
रा.अे/३५/१० चंद्रभागा ओनर्स असोसिएशन
सेक्टर १३, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.पद्मा जनार्दन अनेराव
वय : ६४ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.कार्तिक गार्डन को.ऑप.हौ.सोसा.,
रुम नं.०१, जरीमरी मंदिर जवळ,
सुकापूर, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.कलावती अरुण जाधव
वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.५/१०३, स्वागत कॉम्प्लेक्स,
जरीमरी मंदिरजवळ, सुकापूर,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार नं.१ यांचे पती व नं.२ ते ५ यांचे वडील कै.श्रीपत बाजीराव शिंदे हे दिनांक १५/१२/२००५ रोजी मयत झाले असून कै.श्रीपत बाजीराव शिंदे यांना दिनांक १९/०४/२००५ रोजीचे परिमोचनपत्र (रिलीज डिड) ने खालील वर्णनाची मिळकत प्राप्त झाली आहे. सदरहू मिळकतीमध्ये त्यांचा ५०% हिस्सा आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**चंद्रभागा ओनर्स असोसिएशन, अे/३५/१०, प्लॉट नं.९, सेक्टर १३, नवीन पनवेल, क्षेत्र १३.५० चौ.मी.**
**वर बांधलेली घर इमारत**

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने कै.श्रीपत बाजीराव शिंदे यांचे ५० टक्के हिश्श्यासंबंधी वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार कै.श्रीपत बाजीराव शिंदे यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदारांचे हक्काबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास अथवा वारसदाखला देण्यास कोणतीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतलया नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार जर कै.श्रीपत बाजीराव शिंदे यांचे वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक ३१/१०/२०२० रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## जसवली येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन हरिहरेश्वर मार्गावरती असलेल्या जसवली या गावातील मदिना मोहल्ला परिसरात एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी श्रीवर्धन पोलिसांनी अदनान असफ जवरे वय पंचवीस याच्यावरती गुन्हा दाखल केला आहे.

सदर आरोपी हा पीडित मुलीचा सावत्र वडील असल्याची माहिती समोर आली आहे. सदर पीडित मुलीला आरोपी हा श्रीवर्धन तालुक्यातील वावे पंचतन परिसरातील जंगलामध्ये त्याचप्रमाणे राहत्या घरी व टेरेस वरती घेऊन अत्याचार करत असे, आणि जर तु कुणाला सांगितले तर तुला जिवे ठार मारण्याची धमकी देत असे. याप्रकरणी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून ३५ / २०२० भा.द.वि. कलम ३७६ ए बी, ३७६ एन,५०६ व बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (पोस्को)२०१२,२,४,८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी महिला पोलीस नाईक एस.एम. गुरव यांनी तक्रार दाखल केली असून अधिक तपास महिला पोलीस उपनिरीक्षक मुळीक मॅडम या पोलिस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

## महाराष्ट्र वारकरी महामंडळ रा.जि.कार्यकारिणीची निवड

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

महाराष्ट्र वारकरी महामंडळ युवा शाखा रायगड जिल्हा कार्यकारिणी जाहिर झाली असून दिनेश महाराज महाडिक यांची उत्तर रायगड विभागीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य वारकरी महामंडळाच्या नुकत्याच झालेल्या सभेत सदर रायगड जिल्हा संलग्न तालुके पन-वेल, उरण, पेण, खालापुर, कर्जत, सुधागड व अलिबाग या तालुक्यांचा समावेश असलेल्या युवा शाखेची निवड करण्यात आली असून अध्यक्षपदी दिनेश महाराज महाडिक यांची यर कार्याध्यक्षपदी योगेश विलास कदम यांची कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. तर सचिव पदी रूपेश महाराज शेळके व कोषाध्यक्ष पदीअम्रुत महाराज मोरे आदींची निवड करण्यात आली आहे

त्यांच्या या निवडीबद्दल महाराष्ट्र वारकरी महामंडळ, महाराष्ट्र व महाराष्ट्र वारकरी महामंडळ युवा शाखा यांच्या वतीने तसेच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींकडून अभिनंदन व्यक्त होताना दिसत आहे.

## कोलाड येथे शोक सभा

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

बंजारा समाजाचे दैवत संत सेवालाल महाराज यांचे वंशज डॉक्टर रामराव महाराज यांचे ३० ऑक्टोबर २०२० रोजी दु:खद निधन झाले. त्यांचे शिष्य महाराष्ट्रात विखुरलेले आहेत. डॉक्टर रामराव महाराज यांच्या निधनाची बातमी समजताच त्यांच्या शिष्यगणात तसेच लाखो चाहत्यांमध्ये दु:ख व्यक्त करण्यात आले. कोलाड येथे श्री. अमोल राठोड यांच्या निवासस्थानी अखिल भारतीय बंजारा समाज कर्मचारी सेवा संस्था शाखा रोहाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. येरळ केंद्रप्रमुख श्री. खेमसिंग चव्हाण यांनी थोर तपस्वी रामराव बापू महाराज यांच्या कार्याची माहिती सांगताना सांगितले की, रामराव महाराजांनी बंजारा चांगली शिकवण दिली ती शिकवण सर्वांनी आचरणात आणून या थोर संताला शेवटपर्यंत स्मरणात ठेवा हीच खरी श्रद्धांजली असल्याचे खेमसिंग चव्हाण यांनी सांगितले.

## हिरवळच्या मुक्तांगणमधील मतिमंद मुलांचे वर्क फ्रॉम होम

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट संचालित मुक्तांगण मतिमंद मुलांच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी वर्क फ्रॉम होम तत्वावर केलेल्या सुंदर, आकर्षक आणि रंगीबेरंगी पणत्यांचे विक्री व प्रदर्शन उद्या, गुरूवार, दि. ५ नोव्हेंबरपासून महाड शहरातील मध्यवर्ती ठिकाणी आयोजित करण्यात आले असल्याची माहिती संचालिका मंजुषा साबळे यांनी येथे दिली.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि हिरवळचे सर्वेसर्वा किशोरभाई धारिया यांच्या मार्गदर्शनाखाली गुरूकुल संस्थेंतर्गत मुक्तांगण मतिमंद मुलांच्या शाळा सुरु असून कोरोनाच्या पार्श्वभूमीवरील लॉकडाऊन काळात मतिमंद पाल्यांना पालकांनी दूर्लक्ष होउफ न देता प्रशिक्षिका मंजुषा साबळे, पूनम जाधव, श्रध्दा चोरगे यांच्या माध्यमातून वर्क फ्रॉम होम करण्यास आग्रह धरला. यावेळी आगामी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर मागील वर्षीप्रमाणे मतिमंद मुलांना प्रोत्साहन देऊन विविध रंगाच्या आकर्षक पणत्या, दिवे तसेच अन्य साहित्याची निर्मिती करण्याकामी प्रशिक्षित मार्गदर्शन मिळाल्याने मोठ्या संख्येने या वस्तुंची निर्मिती करण्यात आली.

घरात बसूनच मतिमंद मुलांची कलाकौशल्यासह झालेल्या उत्पादनांना महात्मा गांधी मार्गावरील धारिया कॉर्नरवर विक्री आणि प्रदर्शनासाठी सायंकाळी ४ ते ७ या दरम्यान मांडण्यात येणार आहे. महाड शहरवासियांनी मुक्तांगणच्या मतिमंद विद्यार्थ्यांच्या कलाकौशल्याला प्रोत्साहन मिळण्यासाठी मोठ्या प्रमाणात या आकर्षक पणत्या व दिव्यांची खरेदी करण्याचे आवाहन यावेळी संचालिका मंजुषा साबळे यांनी केले आहे.

# प्रकल्पांसाठी उभारण्यात येणाऱ्या सनदशीर लढ्यास सर्व मतभेद विसरून पाठींबा द्यावा : ॲड.सुरेश ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई ९५ गावं, नैना व इतर प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्या वतीने विहिघर गावं पनवेल येथे कोविड १९ नियमांचे पालन करून शेतकऱ्यांची बैठक झाली. बैठकीत पनवेल उरण तालुका व नवी मुंबई प्रकल्पग्रस्त शेतकरी बांधवांचे प्रलंबित प्रश्न मागण्या सोडविणसाठी संघटनेच्या माध्यमातून येत्या काळात करण्यात येणाऱ्या विविध बाबीवर भूमिका मांडण्यात आली.

सिडको मार्फत २९५ गावात राबविण्यात येणाऱ्या नैना प्रकल्पासाठी शेतकऱ्यांनी त्यांची समंती न घेता हा प्रकल्प सिडको मार्फत काही विशिष्ट्य घटकांसाठी राबविण्यात येत असून त्यास स्थानिक शेतकऱ्यांचा १००% विरोध असून सदर प्रकल्पास कोणतीही जमीन, सहमती देणार नसल्याचे सर्वानुमते जाहिर केले असून सिडको लवाद मार्फत एकतर्फी शेतकऱ्यांना घाबरविण्या करिता बेकायदेशररित्या प्रती एकरी रू.तीस ते चाळीस लाख रुपये बेटर मेंट चार्जेस व विकास शुल्क भरण्यासाठी बजावण्यात आलेल्या नोटीसाना कायदेशीर उत्तर देण्याचे तसेच कोणतेही शुल्क न भरण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच भूमिपुत्रांनी गरजे नुसार बांधकामे नियमित करणे, नवी मुंबईतील शेतकऱ्यांना पावणेचार टक्के भूखंड वाटप करणे, वाढीव भावाची रक्कम मिळविणे, शिक्षवृती योजना चालु करणे मच्छीमार बांधवांचे प्रलंबित प्रश्न बाबत मंत्रालय स्तरावर संघटनेमार्फत पाठपुरावा करण्यात येणार आहे. तसेच भूमिपुत्रांनी येत्या काळात आपल्या समाजाच्या विकासासाठी व आपल्या न्याय हक्कासाठी संघटनेमार्फत उभारण्यात येणाऱ्या सनदशीर लढ्यास सर्व मतभेद विसरून पाठींबा द्यावा असे आवाहन अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर यांनी केले आहे. सभेस ॲड सुरेश ठाकूर, ॲड मदन गोवारी नामदेव शेठ फडके, रमाकांत पाटील, सुभाष शेठ भोपी, ॲड निग्रेश पाटील, आर डी घरत, वामन शेळके, सुरेश पवार, रमन कासकर, बाळाराम फडके, बळीराम पाटील, अनिल ढवळे आदि मान्यवर उपस्थित होते.

## मोटार सायकलवरुन उडाल्याने मृत्यू

**दै.रायगड नगरी । वाकण**

मुंबई-गोवा महामार्गावरील भल्या मोठ्या खड्ड्यात मोटारसायकल आदळल्याने मोटारसायकलवर मागे बसलेल्या कल्पना किशोर लोलगे (वय ३५) रा. लोलगेवाडी ता. सुधागड (सध्या रा. आसनपोई, ता. महाड) यांच्या डोक्याला गंभीर स्वरुपाच्या जखमा झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात मंगळव-ारी (दि.३) सकाळी ८.१५ वाजण्याच्या सुमारास मुंबई-गोवा महामार्गावरील कानसई येथील हॉटेल बिजली जवळच घडला. गेली अकरा वर्षे अपूर्ण अवस्थेतील मुंबई - गोवा महामार्गावरील खड्ड्यानेच या महिलेचा बळी घेतल्याने हा महामार्ग पूर्ण होणार तरी कधी व तोपर्यंत अजून किती बळी घेणार ? असे प्रश्न उपस्थित करून वाहनचालक व प्रवाशांतून याप्रकरणी तीव्र संताप व्यक्त होत आहे.

नोकरीनिमित्त महाड तालुक्यातील आसनपोई येथे राहणारे किशोर बंडू लोलगे (वय ३७) हे आपल्या पत्नी व १० वर्षीय मुलीसह पाली-सुधागड तालुक्यातील लोलगेवाडी या आपल्या मूळ गावी येत होते. मात्र नागोठण्याजवळील कानसई गावाच्या हद्दितील हॉटेल बिजली जवळील मुंबई - गोवा महामार्गावर असलेल्या महाकाय खड्ड्यात किशोर लोलगे यांची मोटारसायकल जोरात आदळली. त्याचवेळी मोटारसायकलच्या पाठीमागे बसलेल्या कल्पना लोलगे या मागच्या मागे उडाल्या. त्याची कल्पना गाडीवर दोघांच्या मध्ये बसलेल्या किशोर लोलगे यांच्या दहा वर्षीय मुलीने लोलगे यांना दिली. त्याचवेळी किशोर यांनी आपली मोटारसायकल मागे फिरवली. मात्र कल्पना यांच्या डोक्याला गंभीर स्वरुपाच्या जखमा झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## ओबीसी संघर्ष समितीचे तहसीलदारांना निवेदन

### ओबीसींच्या आरक्षणाला हात लावू नका संघर्ष समितीची मागणी

**दै.रायगड नगरी । गणेश चोडणेकर**

**आगरदांडा** : मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी समाजाच्या आरक्षणाला हात लावू नये.ओबीसी समाजाचे अनेक प्रश्न सुटलेले नाहीत. मुलांना शष्यवृत्ती सुद्धा मिळत नाही. मग इतरांना आरक्षण देऊन आमचा हक्क हिरावून घेऊ नका. मराठा समाजाच्या आरक्षणावरून ओबीसी व

सर्वसामान्य विद्यार्थी सरळसेवा भरती प्रक्रियरेवर मोठा परिणाम झाला आहे. अश्या अनेक प्रश्न घेऊन आज ओबीसी संघर्ष समितीचे मुरुड नगरपरिषदेकडून शिव पुतळ्यास पुपमाला अर्पण करून मुरुड तहसील कार्यालयाजवळ संघटित होऊन आपले निवेदन मुरुड तहसीलदार गमन गावित याना देण्यात आले.

यावेळी सुधीर दांडेकर यांनी भाषणात सांगितले कि, मराठा आरक्षण देताना ओबीसी च्या आरक्षण कोठ्याला हात लावता काम नये. एकतर ओबीसी ना मिळणाऱ्या शासनाकडून सुविधा त्या पूर्ण केल्या जात नाहीत. त्यातच आमच्या आरक्षणाला जर हात लावत असेल तर ते आम्ही कदापि सहन करणार नाही. भंडारी बोर्डिंगचे अध्यक्ष श्रीकांत सुर्वे यांनी ओबीसी समाजाचा ज्या मागण्या आहेत त्या पूर्ण करण्यात याव्यात तसेच आमचा जो कोठा आहे तो कोणी हिरावून घेऊ नका अन्यथा संपूर्ण ओबीसी समाज रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही. तर ओबीसी सेलचे तालुका संघटक किरण डिके यांनी शासनाला इशारा दिला आहे कि, निवेदनात नमूद केलेल्या मागण्या त्वरित पूर्ण करा अन्यथा ओबीसींच्या सर्व लोकांना एकत्र करून मोठे जनआंदोलन छेडले जाईल असा इशारा यावेळी देण्यात आला.

## आर. सी. एफ. कंपनीमध्ये कॉंट्रॅक्टर मार्फत काम करणाऱ्या कामगारांना दिवाळी सणाकरिता सानुग्रह अनुदान मिळालेच पाहिजे ; शेकापची मागणी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आर. सी. एफ. कंपनीमध्ये कॉंट्रॅक्टर मार्फत काम करणार्या कंत्राटी कर्मचारी हे गेली अनेक वर्ष प्रामाणिक पणे वर्षानूवर्ष काम करीत आहेत, कोरोनाच्या महामारीत सुद्धा आपल्या जीवाची पर्वा न करता ते काम करीत होते, तर काहींना कोरोनाची लागण होऊन मृत्यूला सामोरे जावे लागले.

कामगारांनी कंपनीच्या कामात सातत्य ठेवून कंपनीच्या प्रॉडक्शन वाढीसाठी प्रयत्न करून कंपनी नफ्यामध्ये वाढ केलेली आहे. कंपनीत काम करणाऱ्या प्रत्येक कामगाराला दिवाळी सणापूर्वी कंपनी कडून सानुग्रह अनुदान म्हणून वीस हजार रुपये देण्यास यावी अशी मागणी शेकाप महिला आघाडीच्या नेत्या चित्रलेखा पाटील यांनी आमदार भाई जयंत पाटील यांच्या निवेदनाद्वारे केली. आर. सी.एफ. थळ युनिटचे एक्सिक्यूटिव्ह डायरेक्टर ए. व्ही. लोणकर यांच्या कडे मागणीचे पत्र सुपूर्त करण्यात आले. या प्रसंगी सतिष म्हात्रे, श्रमिक कामगार युनियन थळ युनिट सेक्रेटरी विजय नाईक आणि कंत्राटी कामगार युनियनचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. सर्वांना दिवाळी पूर्वी बोनस मिळा-लाच पाहिजे, बोनस मिळणे हा कर्मचार्यांमचा हक्क असून कंपनीचे कर्तव्य आहे. शेतकरी कामगार पक्ष सर्व कर्मचार्यां च्या पाठीशी भक्कम पणे उभा आहे, जर बोनस मिळाला नाहीतर शेकाप आक्रमक पवित्रा घेईल असे चित्रलेखा पाटील यांनी सांगितले.

## उरण शहरातील प्रतीक अपार्टमेंट मध्ये लागली आग ; सुदैवाने जीवितहानी टळली

**दै.रायगड नगरी । विठ्ठल ममताबादे**
**दै.रायगड नगरी । उरण**

उरण शहरातील विमला तलावाला लागून असलेल्या नागाव रोडवरील प्रतीक अपार्टमेंटच्या इमारतीला ग्राउंड फ्लोअर वर शॉर्टसर्किट मुळे आज दि ३ रोजी सकाळी ६:१५ वाजन्याच्या सुमारास आग लागली सुदैवाने या आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले असून सुदैवाने जीवितहानी टळली आहे.

प्रतीक अपार्टमेंट नागाव रोड, विमला तलाव (गार्डन )शेजारी येथे अपार्टमेंट मध्ये सकाळी ६:१५ वाजण्याच्या सुमारास विजेच्या शॉर्ट सर्किट मुळे आग लागली आग जास्त भडकत होती. इमारत मधील नागरिक गाढ झोपेत होते तर काही नागरिक आपल्या कामावर जाण्याच्या गडबडीत होते. ग्राउंड फ्लोअर येथे सर्व नागरिकांचे विजेचे मीटर आहेत, मेन कनेक्शन आहेत तेथून जवळचवीजेच्या वायरला ही आग लागली. ही वायर संपूर्ण इमारत मध्ये सर्वत्र पसरली आहे. आग लागल्याचे समजताच बाजूला असलेल्या गार्डन मध्ये व्यायामासाठी, मॉर्निंग वॉक साठी आलेल्या नागरिकांनी एकच गर्दी केली मात्र एकानेही पुढे येऊन ती आग बुजवण्याचे प्रयत्न करत नव्हते. इमारत मधील नागरिक सुद्धा वरती अडकले होते त्यामुळे आग जास्त भडकण्याची लक्षणे दिसू लागली मात्र काही जागरूक नागरिकांनी प्रसंगावधान राखत या आगीवर नियंत्रण मिळविले.

## धोकादायक रोहित्रांना वाली कोण ? सर्वसामान्य नागरिकांचे सवाल

**दै.रायगड नगरी । पाली**

शहरातील हटाळेश्वर चौकातील काळे चनेवाले यांच्या दुकानं शेजारील विद्युत रोहित्रे असून, या रोहित्राला घातलेले सुरक्षा कुंपण अनेक ठिकाणी तुटलेल्या परिस्थतीत आहे. त्यातच नागरिक या ठिकाणी कचरा टाकत असल्यामुळे सर्व कचरा विद्युत रोहित्राच्या सुरक्षा कुंपणाच्या आतमध्ये पसरल्यामुळे इथे आग लागण्याचा धोका निर्माण झाला आहे. विद्युत रोहित्रांना अचानक कधीही आग ला-गते किंवा त्यातील तेलाची गळती सुरू होत असते. त्यातच नागरिक येथे ओला व सुका कचरा टाकत असल्यामुळे येथे अपघाताला निमंत्रण मिळत आहे.

या परिसरातील नागरिक झाडांच्या फांद्याचा कचरा येथे आणून टाकत असल्यामुळे भटकी जनावरे या कचऱ्यावर चरण्यासाठी येत असतात. तसेच घरातील ओला कचरा टाकत असल्यामुळे भटकी कुत्री अन्नाच्या शोधात अशा धोकादायक विद्युत रोहित्राच्या तुटलेल्या सुरक्षा कुंपणाच्या आत वावरत असतात. कचरा गोळा करणाऱ्या महिला व पुरूषदेखील या ठिकाणी कचरा गोळा करण्यासाठी फिरत असतात. अशा परिस्थितीत जर एखादा प्राणी किंवा माणूस या विद्युत रोहित्राच्या जवळ गेला तर मोठा अनर्थ घडू शकतो. नागरिक येथे कचरा टाकत असल्यामुळे पाली ग्रामपंचायतीचे कचरा गोळा करणारे कर्मचारी जिवाच्या भीतीने त्या विद्युत रोहित्राच्या जवळ जाण्यास घाबरत असतात. त्यामुळे तेथील साफसफाई करता येत नसल्यामुळे येथे कायमस्वरूपी कचरा असल्याचे दिसून येते. या विद्युत रोहित्राचा स्फोट होऊन अनेक वेळा आग लागलेली आहे. अशा विद्युत रोहित्रांच्या सुरक्षा कुंपणाची विद्युत विभागाकडून त्वरित डागडुजी करून येथील कचरा त्वरित हलविण्याची मागणी येथील नागरिक करत आहेत.

## मोबाईल चोरुन पसार होणाऱ्या गुन्हेगारास गुन्हे शाखा कक्ष २ ने केले गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मॉर्निंग वॉक करीत असताना एका इसमाकडे असलेला मोबाईल फोन दोन अज्ञात चोरट्यांनी खेचून घेवून मोटार सायकलीवरुन पसार झाल्याप्रकरणी गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने एका आरोपीस ताब्यात घेतले असून त्याच्याकडून गुन्ह्यातील मोबाईल फोन व मोबाईल हस्तगत केली आहे.

सदर गुन्ह्याची माहिती मिळताच गुन्हे शाखा कक्ष २ पन-वेलचे सपोनि कराड, सपोनि गायकवाड, सपोनि ढोले, पो. हवा.साळुंखे, पो.हवा.पवार, पो.हवा.गडगे, पो.हवा.पाटील, पो. ना.कुदळे, पो.ना.कानु आदींचे पथक गुन्हेगाराचा शोध घेत असताना पोलीस नाईक सुनील कुदळे यांना मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे आणि तांत्रिक तपासाद्वारे त्यांनी सदर गुन्ह्यातील आरोपी मन्नान अजीज पटेल रा.तळोजा यास सापळा रचून ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून गुन्ह्यातील १४ हजार रुपये किंमतीचा नोकिया कंपनीचा मोबाईल तसेच ५० हजार रुपये किंमतीची बजाज पल्सर २२० लाल काळ्या रंगाची मोटार सायकल असा एकूण ६४ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.